**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ६**

दिनांक :- १४/०८/२०१४ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक १४/०८/२०१४ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष

२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३. मा. शमीम पठाण

४. मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव

५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन

६. मा.को-हाळे अनंत सुभाष

७. मा. गावडे जयश्री वसंत

८. मा.साबळे छाया जगन्नाथ

९. मा. जगताप विमलताई सुरेश

१०. मा. पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा

११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

१२. मा. गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश

१३. मा.कलाटे स्वाती मयूर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. क्षेत्रीय अधिकारी - सुभाष माछरे, मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा - भगवान बो-हाडे, मा. कार्यकारी अभियंता – रविंद्र दुधेकर, गोपाळ चिंचवडे, रामदास तांबे, उपअभियंता,- के. डी. फुटाणे, सुधाकर कुदळे, एन. आर. निबाळकर, सी.बी.कोंडे, एम.एम.चव्हाण, व्ही.एन.देसले, शेख , लेखाधि कारी – इनामदार सहा. आरोग्याधिकारी - जे.एस. जानकर, जी.एस. देशपांडे, उद्यान - डी. एम. आढळे, आर. बी. चांदेरे इत्यादी.

\- - - - - -

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. ३ चिंचवड गावातील भाजीमंडई व मच्छी मार्केट मध्ये शबाना लतिफ मुलाणी यांना ११ महिने कराराने गाळा मनपाच्या अटी व शर्तीनुसार देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.४ वाकड प्रभाग क्रमांक ५३ मधील विकास कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.५ मनपा शौचालय आणि सिमा भि त हटविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र.६ तरतुद वर्गीकरणाच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे
विषय क्र.७ सत्कार करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे
विषय क्र.८ प्रभाग क्रमांक ५३ वाकडमधील सौंदर्य हॉटेलच्या बाजूला असणा-या रोडला कै.पै. शंकरराव श्रीपतराव गायकवाड मार्ग असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे
विषय क्र.९ चिंचवडेनगर येथील नव्याने विकसित झालेल्या रोडला कै.तुकाराम महादु चिंचवडे असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे
विषय क्र.१० गणेशनगर येथील चिंचवड स्टेशन उडडाण पुलाच्या भुयारी मार्गास सामाजिक कार्यकर्ते कै. विजय जगन्नाथ पाटील यांचे नांव देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विंचार करणे
विषय क्र.११ प्रभाग क्र.२० चिंचवडेनगर येथे नुकताच नवीन हॉल बांधण्यात आलेला आहे. सदर हॉलला कै.सौ. मनिषाताई भोईर हास्य योगा केंद्र असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे .

तदनंतर मा.अनंत को-हाळे यांनी पुढील प्रमाणे सुचना मांडली

आज दिनांक १४/८/२०१४ रोजीच्या प्रभाग समितीमध्ये माळीण येथे अपघात झालेले तसेच, विजू पाटील ,माजी खासदार किसन बानखेले, विजय जगन्नाथ पाटील माजी महापौर नानासाहेब शितोळे, बबनराव मोरे या सर्वाना श्रध्दाजंली वाहणेत यावी व आज रोजीची प्रभाग समितीची सभा दिनांक २०/८/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत यावी .
सदर सुचनेस मा.विनय उर्फ विनायक गायकवाड यांनी अनुमोदन दिले.

**(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)**

\- - - - - -

त्याप्रमाणे मा.सभाध्यक्ष शेखर ओव्हाळ यांनी आज दिनांक १४/८/२०१४ रोजीची प्रभाग समितीची सभा दिनांक २०/८/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे जाहिर केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/९२ /२०१४.
दिनांक : ११/०९/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**सभावृत्तांत**
**( दिनांक १४/८/२०१४ रोजीची तहकुब सभा )**
**कार्यपत्रिका क्र. ६**

दिनांक :- २०/०८/२०१४ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक २०/०८/२०१४ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.लोंढे गणेश नारायण
४. मा. शमीम पठाण
५. मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
६. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
७. मा.डोके अपर्णा निलेश
८. मा.को-हाळे अनंत सुभाष
९. मा. शि दे शि तल उर्फ विजय गोरख
१०. मा. गावडे जयश्री वसंत
११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१२. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१३. मा. गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१४. मा.कलाटे स्वाती मयूर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. क्षेत्रीय अधिकारी - सुभाष माछरे, मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा - भगवान बो-हाडे, मा. कार्यकारी अभियंता – रविंद्र दुधेकर, गोपाळ चिंचवडे, रामदास तांबे, शेख , लेखा धि कारी – इनामदार सहा. आरोग्याधिकारी - जे.एस. जानकर, जी.एस. देशपांडे, उद्यान - डी. एम. आढळे, आर. बी. चांदेरे इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

अ) दि. १६/०७/२०१४ (कार्यपत्रिका क्र.५) रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. अध्यक्ष यांनी प्रकट केले.

ठराव क्र. १५ विषय क्र. १
दि. २०/०८/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा. गणेश नारायण लोंढे अनुमोदक: मा.अँड.संदिप गुलाबराव चिंचवडे

ब क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील हॉकर्स झोन निशचिती करणेबाबतचा विषय मा.प्रभाग समितीपुढे अवलोकनार्थ आला असता , सर्व सन्मा. सदस्य यांनी असे सुचित केले की, प्रत्येक वॉर्डाचे दोन नगरसेवक व स्थापत्य विभागाचे अधिकारी यांनी हॉकर्स झोनच्या जागासंदर्भात चर्चा करुन समन्वयाने हॉकर्स नो हॉकर्स जागा निश्चीत कराव्यात असे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक १६ विषय क्र.२
दिनांक २०/८/२०१४ विभाग – पाणीपुरवठा
सुचक :- मा. आश्विनी गजानन चिंचवडे -पाटील अनुमोदक :- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ :- क्र.पापु/बक्षेका/६४५५/१/२०१४ दि. ८/८/२०१४ रोजीचा मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव

सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-२०१५ चे मुळ अंदाजपत्रकात पाणीपुरवठा ब प्रभाग किरकोळ दुरुस्ती र.रु.१,११,३१,०००/- इतकी आहे.

सदर अंदाजपत्रक तयार करतांना अंदाजपत्रकांमध्ये सर्व चालु , निविदा कार्यवाही व नियोजित कामाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. सव प्रकारची नियोजित कामे अंदाजपत्रत समाविष्ठ व्हावीत यादृष्टीने बहुतांशी कामांना ३ लाख , ४ लाख, ५ लाख अशा तरतुदी ठेवण्यात आलेल्या आहेत त्यामुळे चालु कामे निविदा कार्यवाही कामे व प्राधान्याने करावयाची नि योजित कामे यांचा विचार करुन त्या त्या कामांना अंदाजपत्रकानुसार या आर्थीक वर्षात आवश्यक तरतुद उपलब्ध करणेच्या दृष्टीने अंतर्गत बदल करुन तरतुद वर्ग करणेचा प्रस्ताव करणेत आलेला आहे सदरची अंतर्गत तरतुद वर्ग करणेचा प्रस्तावास मा.प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब सदरच्या कामाच्या प्रस्तावास मान्यता देणेस तसेच प्रपत्र अ मधील नमुद केलेल्या प्रपत्रास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक १७ विषय क्र.३
दिनांक २०/८/२०१४ विभाग - मा.सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा.आश्विनी गजानन चिंचवडे-पाटील अनुमोदक :- अँड संदिप चिंचवडे
संदर्भ :- मा.आश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचे दिनांक १४/८/२०१४ रोजीचे पत्र.

चिंचवड गावठाण प्रभाग क्र.२२ मधील भाजी मंडई व मच्छी मार्केट मध्ये शबाना लतिफ मुलाणी यांना ११ महिने कराराने गाळा महापालिकेच्या अटी व शर्तीनुसार देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्यावर पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक १८ विषय क्र.४

दिनांक २०/८/२०१४ विभाग – मा.सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक :- मा.स्वाती मयुर कलाटे अनुमोदक :- मा.आश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

संदर्भ :- मा.स्वाती मयुर कलाटे यांचे दिनांक १४/८/२०१४ रोजीचे पत्र.

वाकड प्रभाग क्रमांक ५३ मधील पुढे नमुद केल्याप्रमाणे विकास कामांना मान्यता देणेत येत आहे.

१. वाकड प्रभाग क्र.५३ भौगोलीक दृष्टया मोठा असल्याने या प्रभागाला स्वतंत्र आरोग्य निरिक्षक देणेस.

२. संपुर्ण प्रभागाला वाकड गावठाण याठिकाणी एकच आरोग्य कोठी असल्याने आरोग्य कर्मचा-यांना हजेरीच्या ठिकाणापासून कामाच्या ठिकाणी ३ ते ३.५ कि.मी.लांब जावे लागते. त्याकरीता भुमकर चौक व कावेरी नगर याठिकाणी आरोग्य कोठी बांधून मिळणेस.

३. राजीव गांधी इन्फोटेक पार्कमुळे प्रभाग क्र.५३ मध्ये लोकसंख्या वाढली आहे व झपाटयाने वाढतही आहे परंतु वाढती लोकसंख्या / कुटुंबसंख्या सोसायटया यांचा विचार करता प्रभागात कचरा गोळा करणेकरीता १३ गाडयांची आवश्यकता असून सध्या ६ गाडया उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रभागातील नागरीकांचा कचरा रोज उचलला जात नाही. तरी संबंधीत आरोग्य अधिका-यांनी यंत्रणा उपलब्ध करुन देणेस.

४. प्रभागात असलेले ठेकादाराचे कामगार काम करत नाहीत.

५. वाकड गावठाणातील स्मशानभूमीचे काम चांगल्या प्रकारे करण्यात आले आहे. परंतु त्याठिकाणी असलेले रखवालदार कायम त्या ठिकाणी उपस्थि त रहात नाहीत. त्यामुळे स्मशानभुमीत जवळचे नागरीक प्रातविधीसाठी त्या ठिकाणी जातात व घाण करतात त्याचप्रमाणे स्मशानभुमी घाटावर बसविलेल्या फरश्या काही समाजकंटकानी काढल्या आहेत तसेच स्मशानभुमीचा दुरुपयोग केला जातो.

६. भुजबळ वस्ती ते भुमकर वस्ती रस्त्याच्या गटरची दुरुस्ती करणेस.

७. पुना बेकरी मागे असलेल्या नाल्यामुळे त्या ठिकाणी प्रचंड प्रमाणात घाणीचे साम्राज्य झाले आहे त्यावर तातडीने उपाययोजना करणेस

८. औषध फवारणीचा साप्ताहीक प्रोग्राम मिळावा व औषध फवारणीबाबत दर महिन्याचे ५ तारखेला अहवाल दयावा. प्रभागात दर आठवडयाला धुरीकरण करुन मिळणेस.

९. म्हातोबा नगर येथील रस्त्यावर कायमस्वरुपी घाण होत असेल तर त्याचा कायमचा बंदोबस्त करण्यात यावा.

१०. अनमोल रेन्सीडेन्सी मागील नाल्यावर कोबा करुन मिळणेस

११. कस्पटेवस्तीमधील विष्णुदेवनगर मधील पावसाळी गटरची लाईन काढून पुन्हा टाकणेस.

१२. एमरॉल्ड सोसायटी समोरचा अर्धवट १५० मी.नाला पुर्ण बांधुन मिळणेस.

१३. प्रागातील कचरा संकलनाकरीता एक स्वतंत्र रॅम्प तयार करुन मिळणेस

१४. वाकड चौकातून गावठाणात जाणा-या रस्त्याच्या दोन्ही बाजुस फुटपाथ करणेस.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक १९ विषय क्र.५
दिनांक २०/८/२०१४ विभाग :-मा. सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा.झामाबाई बारणे अनुमोदक :- मा.स्वाती कलाटे
संदर्भ :- मा.झामाबाई बारणे यांचे दिनांक १४/८/२०१४ रोजीचे पत्र

मौजे-थेरगांव प्रभाग क्रमांक ५१ मध्ये स.नं.३८ मध्ये थेरगांव करसंकलन विभागामागे मनपा शौचालय आहे. सदर शौचालयासाठी मनपाने सिमा भि त बांधलेली आहे. यापुर्वी सदर शौचालयाचा वापर थेरगांव गावठाणमधील नागरीक करीत होते. सदयस्थीतीत सन २०१२ मध्ये यशवंतराव चव्हाण संकुल नव्याने बांधणेत आलेले आहे. त्यामुळे मनपा शौचालय बंद अवस्थेत आहे. तसेच गावठाणमधील नागरीकांची वैयक्तीक शौचालय आहेत. त्यामुळे थेरगांव करसंकलन विभागामागे शौचालय आणि सिमाभिंत हटविणेस तसेच नाल्याशेजारील (मनपा शाळा) मुतारी हटविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २० विषय क्र.६
दिनांक २०/८/२०१४ विभाग :- आरोग्य
सुचक :-मा.अँड.संदिप गुलाबराव चिंचवडे अनुमोदक:- मा.विनायक गायकवाड
संदर्भ :- बक्षेका/५/कावि/५२७/२०१४, दिनांक १२/८/२०१४ चे पत्र

ब क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "नवीन टायरटयूब खरेदी " या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता तरतुद र.रु. ४,००,०००/- करणेत आली होती.दि. 10/०८/२०१४ अखेर ९३,९७४/- असा खर्च झालेला आहे. २६ जानेवारी २०१४ च्या नवीन प्रभाग रचनेनुसार ड क्षेत्रीय कार्यालयाकडील एकुण ३ प्रभाग ब क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग झाल्याने ड क्षेत्रीय कार्यालयाकडील कचरावाहतूक विभागाकडील अंदाजे ३४ वाहने त्याअनुषंगाने ब क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग झाल्याने सदर वाहनांसाठी लागणारे नवीन टायरटयुब खरेदी आवश्यक आहे.

परंतू ब क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "नवीन टायरटयूब खरेदी " या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता तरतुद र.रु. ४,००,०००/-इतकी तरतूद आहे. व सदय परिस्थितीत कमी आहे. तरी आरोग्य विभागाकडील "कचरा उचलणे व हलवणे" या लेखाशिर्षावरील र.रु. ५,००,०००/- इतकी तरतूद आहे व दि. १०/०८/२०१४ पर्यत खर्च निरंक झालेला आहे. त्यामुळे सदरच्या लेखाशिर्षातील रक्कमेमधून र.रु. ४,००,०००/- इतकी रक्कम ब क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "नवीन टायरटयूब खरेदी " या लेखाशिर्षावर वर्ग करणेत यावी.

तसेच २६ जानेवारी २०१४ च्या नवीन प्रभाग रचनेनुसार ड क्षेत्रीय कार्यालयाकडील एकुण ४ प्रभाग ब क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग झाल्याने ड क्षेत्रीय कार्यालयाकडील कचरावाहतूक विभागाकडील घरोघरचा कचरा गोळा करणेसाठीची अंदाजे ३४ वाहने सुध्दा ब क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग झाल्याने वाहनांची संख्या वाढल्याने लागणारे इंधन वापराचे प्रमाण जास्त आहे.

ब क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "गांडूळखत प्रकल्प-हॉटेल वेस्ट व प्रशा.शुल्क वसुलीसाठी वाहन भाडयाने घेणे " या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता तरतुद र.रु. १३,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे . हॉटेलवेस्ट गोळा करणे व वाहतूक करणेचे काम मनपा मार्फतच केले जात असल्याने दि. १०/०८/२०१४ अखेर खर्च निरंक झालेला आहे. तरी ब क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "वाहन इंधन " या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता तरतुद र.रु. १०,००,०००/-इतकी तरतूद आहे दि. दि. ०७/०८/२०१४ पर्यंत सदर लेखाशिर्षावरील र.रु. ४,७८,१५६/- इतका खर्च झालेला आहे व उर्वरित र.रु. ५,२१,८४४/- इतकी रक्कम सदय परिस्थितीत कमी असल्याने "गांडूळखत प्रकल्प-

हॉटेल वेस्ट व प्रशा.शुल्क वसुलीसाठी वाहन भाडयाने घेणे " या लेखाशिर्षावरील र.रु. १३,००,०००/- या रक्कमेमधून र.रु. १०,००,०००/- इतकी रक्कम वर्ग करणेत यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरचा विषय मा. प्रभाग समीती पुढे ऐनवेळेचा विषय निर्णयार्थ ठेवणेत यावा. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २१ विषय क्र.७
दिनांक २०/८/२०१४ विभाग :- मा.सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :-मा.गणेश नारायण लोंढे अनुमोदक:- मा. शितल शिंदे
संदर्भ :- मा.गणेश नारायण लोंढे यांचे दिनांक १४/८/२०१४ रोजीचे पत्र

प्रभाग क्रमांक २१ दळवीनगर येथील कु.अशोक बबन वाडेकर यांनी बारामती येथे झालेल्या शरद पवार श्री केसरी असा मानाचा किताबमिळवला आहे. तरी त्यांचा ब प्रभागातर्फे सत्कार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २२ विषय क्र.८
दिनांक २०/८/२०१४ विभाग :- मा.सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा.विनय गायकवाड अनुमोदक:- मा.अनंत को-हाळे
संदर्भ :- मा.विनय गायकवाड यांचे दिनांक १४/८/२०१४ रोजीचे पत्र.

प्रभाग क्रमांक ५३ वाकड मधील सौदर्य हॉटेलच्या बाजूला असणा-या रोडला कै.पै.शंकरराव श्रीपतराव गायकवाड मार्ग असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २३ विषय क्र.९
दिनांक २०/८/२०१४ विभाग :- मा.सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा.आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी अनुमोदक:- मा.अपर्णा डोके
संदर्भ :- मा.आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी यांचे दिनांक १४/८/२०१४ रोजीचे पत्र.

प्रभाग क्रमांक २० चिंचवडेनगर येथील सावली गार्डनशेजारी नवीन विकसीत झालेल्या चिंचवडेनगर रस्त्याला कै. तुकाराम महादू चिंचवडे असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २४ विषय क्र.१०
दिनांक २०/८/२०१४ विभाग :- मा.सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :- मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे अनुमोदक:- मा.जयश्री वसंत गावडे
संदर्भ :- मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे यांचे दिनांक १४/०८/२०१४ रोजीचे पत्र

गणेशनगर (सुदर्शननगर) येथील चिंचवड स्टेशनला जाणा-या उडडाणपुलाच्या भुयारी मार्गास सामाजिक कार्यकर्ते कै.विजय जगन्नाथ पाटील यांचे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक २५ विषय क्र.११
दिनांक २०/८/२०१४ विभाग :- मा.सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :-मा.आशाताई माऊली सुर्यवंशी अनुमोदक:- मा.अपर्णा डोके
संदर्भ :- मा.आशाताई माऊली सुर्यवंशी यांचे दिनांक २०/८/२०१४ रोजीचे पत्र

प्रभाग क्रमांक २० चिंचवडेनगर येथील रघु माऊली उदयान बिजलीनगर येथे नुकताच नवीन हॉल बांधणेत आलेला आहे. सदर हॉलला कै.सौ.मनिषा ताई भोईर हास्य योगा केंद्र असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ ९३ /२०१४.
दिनांक : ११ /०९/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.